
F.Y.B.A. | इतिहास

भाग २

# भारतीय स्वातंत्र्य चळवळीचा इतिहास

## (१९०५ - १९४७)



डॉ. जी.बी. शहा
डॉ. बी.एन. पाटील

प्रशांत पब्लिकेशन्स
Prashant

# प्रकरण १

# लोकमान्य टिळकांचा कालखंड

## लोकमान्य बाळ गंगाधर टिळक :

हिंदुस्थानमध्ये १९०५ ते १९२० या कालखंडात कॉंग्रेसधील (जहाल गटाचा) जोर होता. या जहाल गटात लो. टिळकांचा समावेश होता. (लो. टिळकांचे पूर्ण नाव बाळ गंगाधर टिळक हे होते. त्यांचा जन्म २३ जुलै १८५६ रोजी रत्नागिरी जिल्ह्यात चितपावन कुटुंबात झाला होता.) १८७९ साली त्यांनी एल्. एल्. बी. ची पदवी मिळविली. त्यांनी वकिलीची पदवी मिळविण्यानंतर कधीच वकिली केली नाही किंवा ते सरकारी नोकरीच्या मागे न लागता त्यांनी सामाजिक कार्यात भाग घेणे सुरू केले. त्यांचे मित्र गो. ग. आगरकर यांच्या बरोबर मिळून त्यांनी पुणे येथे न्यु इंग्लिश स्कूलची स्थापना केली. थोड्याच कालावधीत या शाळेने मोठी प्रगती केली. नंतर त्यांनी केसरी आणि मराठा ही अनुक्रमे मराठी व इंग्रजी वृत्तपत्रे सुरू केली. डेक्कन एज्युकेशन सोसायटीची स्थापना करून फर्ग्युसन कॉलेज त्यांनी सुरू केले. काही वर्षे ते फर्ग्युसन कॉलेजमध्ये प्राध्यापक म्हणून कार्य करित होते. इ.स.१८९० मध्ये त्यांनी नोकरीचा राजीनामा दिला, आणि यापुढे केवळ राजकीय जागृतीच करावयाची हा उद्देश डोळ्यासमोर ठेवुन त्यांनी कार्य सुरू केले.

प्रारंभीच्या काळात गोपाळ गणेश आगरकर यांच्या बरोबर त्यांनी कार्य सुरू केले. हे कार्य करीत असतांना कोणत्या ध्येयाने कार्य करावयाचे या बाबत या दोघात मतभेद निर्माण झाले. आगरकरांच्या मते सुराज्य हे ध्येय समोर ठेवून आपण कार्य केले पाहिजे तर लो. टिळकांनी स्वराज्य या ध्येयासाठी आपण कार्य केले पाहिजे असे सांगितले. अगोदर स्वराज्य की सुराज्य या ध्येयावरून या दोघात मतभेद निर्माण झाले. लो. टिळकांचे दुसरे सहकारी गोपाळ कृष्ण गोखले हे होते. प्रारंभी दोघांनी मिळून कार्य केले नंतर मात्र गोपाळ कृष्ण गोखले आणि लो. टिळक यांच्यात मतभेद निर्माण झाले. कारण टिळक जहाल मतवादी होते तर (गोपाळ कृष्ण गोखले हे मवाळ मताचे पुरस्कर्ते होते.

**जहाल गटाच्या उदयाची कारणे:**

- मवाळांच्या कार्यक्रमाबद्दल असंतोष
- सुशिक्षितांमधील असंतोष
- प्लेग आणि दुष्काळ
- पाश्चिमात्य क्रांतीकारी सिद्धांताचा प्रभाव
- बंगालची फाळणी
- १८९२ च्या कायद्याने केलेली निराशा
- लॉर्ड कर्झनची दडपशाही
- लाल-बाल व पाल या त्रयींचे नेतृत्व

मोर्ले-मिंटो कायदा मंजूर होण्याची कारणे

- १८९२ च्या कायद्याबद्दल असंतोष
- कर्झनचे दडपशाहीचे धोरण
- भारतात संकटांची निर्माण झालेली मालिका
- जपानचा रशियावर विजय
- जहाल गटाच्या नेत्यांचा प्रचार
- इंग्लंडमधील सरकार बदल
- गोपाळ कृष्ण गोखलेंचे प्रयत्न
- मुस्लिम शिष्टमंडळाच्या मागण्या
- परदेशातील हिंदी लोकांना मिळणारी वागणूक
- सशस्त्र क्रांतीकारकांचा जोर

## इंडिया हाऊसची स्थापना -

शामजी यांनी विविध प्रकारे आपले कार्य चालु ठेवले. तेव्हा त्यांच्या लक्षात आले की, जे विद्यार्थी भारतातून येथे शिक्षणासाठी येतील त्यांच्या राहण्याची सोय कमी खर्चात झाली पाहिजे. या उद्देशाने त्यांनी लंडनमध्ये इंडिया हाऊसची निर्मिती केली. या निर्मितीमागील त्यांची दुसरी प्रेरणा म्हणजे इंडिया हाऊस हे राष्ट्रीय प्रेरणांचे केंद्र बनावे. येथून अनेक विद्यार्थ्यांनी राष्ट्रीय प्रेरणा घेवून भारतात परतावे आणि तेथे त्यांनी कार्य सुरु करावे. इंडिया हाऊसच्या निर्मितीने त्यांचे वरील दोन्ही उद्देश सफल झाले. याच इंडिया हाऊसमध्ये वि.दा. सावरकर, सेनापती वसंत बापट सारख्या क्रांतीकारकांचे वास्तव्य होते.



वि. दा. सावरकर

## शामजी वर्मांना लंडन सोडावे लागले -

इंडियन सोशॉलॉजिस्ट वृत्तपत्रातून जे लिखाण प्रकाशित होत होते ते ब्रिटीशांना आवडणे शक्य नव्हते. शामजी वर्मा यांचे लिखाण हे देशद्रोही स्वरुपाचे आहे अशी टीका त्यांच्यावर ब्रिटीश पार्लमेंटमध्ये होवून पार्लमेंटमध्ये या वृत्तपत्राविरुध्द मोठा गदारोळ उडाला. तेव्हा शामजी वर्मा यांना इंग्लंड सोडावे लागले व ते फ्रांसची राजधानी पॅरिस येथे आले. तेथेही त्यांनी आपले क्रांतीकार्य सुरु ठेवले. भारतीयांना ब्रिटीश सरकार कसे वागतीत आहे, त्यांची कशी लूट होत आहे हे जगाला कळावे म्हणून पॅरिस येथे त्यांनी पॅरिस इंडियन सोसायटी नावाचे वृत्तपत्र सुरु करुन आपले क्रांतीकार्य चालू ठेवले.

## शामजी वर्मांना मादाम कामाचे सहकार्य -

मादाम कामा या पारशी महिला होत्या. दादाभाई नवरोजी हे इंग्लंडच्या पार्लमेंटचे सभासद होते तेव्हा मादाम कामा यांनी त्यांचे सचिव म्हणून काम केले होते. मादाम कामा या क्रांतीकारी विचारांच्या असल्याचे पॅरिस येथे त्या शामजी वर्मा यांच्या कार्यात सहभागी झाल्या. त्यांनी होमरुल सोसायटीचे प्रतिनिधी म्हणून अमेरिकेचा दौरा करुन अमेरिकन लोकांसमोर भारतीयांच्या व्यथा मांडून ब्रिटीशांचे खरे स्वरुप जगापुढे उभे करण्याचा प्रयत्न




मादाम कामा

प्रकरण ३

# म. गांधीजी आणि राष्ट्रीय चळवळ

**महात्मा गांधीजी (२ ऑक्टो. १८६९ ते ३० जाने. १९४८)**

महात्मा गांधीजी यांचा गौरव 'राष्ट्रपिता' म्हणून केला जातो. त्यांचा जन्म पोरबंदर येथे २ ऑक्टोबर १८६९ रोजी झाला. त्यांचे पूर्ण नाव मोहनदास करमचंद गांधी हे होते. त्यांचे वडील प्रथम पोरबंदर येथे व नंतर राजकोट संस्थानचे दिवाण होते. म. गांधीजींची माता पुतळाबाई ह्या धार्मिक प्रवृत्तीच्या असल्याने बालपणी म. गांधीजीवर चांगले संस्कार झाले व त्यातून अहिंसा व सत्याग्रह मार्गाची कल्पना त्यांना सुचली.



महात्मा गांधी

इ.स.१८८७ साली ते मॅट्रिकची परिक्षा उत्तीर्ण झाले. त्यानंतर त्यांना इंग्लंडला पाठवायचे ठरले. त्यांनी डॉक्टर व्हावे अशी अनेकांची इच्छा होती. परंतु डॉक्टरकीचे शिक्षण घेताना मृत शरिराला हात लावावा लागतो, ही कल्पना त्यांच्या वडील बंधूना आवडली नाही. म्हणून इ. स. १८८८ मध्ये त्यांना डॉक्टर होण्याऐवजी बॅरिस्टर होण्यासाठी इंग्लडला पाठविले. तेथे पाठविण्यापूर्वी गांधीजींच्या मातेने त्यांच्याकडून मद्य, मांस व परस्त्रीला स्पर्श करणार नाही अशी शपथ घेतली होती. वयाच्या तेराव्या वर्षीच त्यांचा विवाह कस्तुरबाई यांच्याशी झाला होता.

**आफ्रिकेला प्रयाण** – १० जून १८९१ रोजी महात्मा गांधीजी बॅरिस्टर झाले. त्यानंतर ते मुंबई येथे आले. तेथे त्यांनी वकिलीच्या व्यवसायास प्रारंभ केला. त्यावेळी पोरबंदरच्या एका मुसलमान व्यापाऱ्याने त्यांची गाठ घेऊन त्यांच्या वैयक्तिक कोर्टाच्या कामासाठी म. गांधीजींना आफ्रिकेत पाठविले. १८९३ च्या एप्रिलमध्ये म. गांधीजी आफ्रिकेत गेले. तेथे ते सुमारे वीस वर्षे राहिले.

या काळात अनेक हिंदी लोकांना मजूर म्हणून आफ्रिकेत पाठविले जाई. तेथे त्यांना अपमानास्पद वागणूक दिली जाई. नाताळ, ट्रान्सवाल आणि ऑरेंज फ्री स्टेट

या टीकेमुळे सरकारला जनहितासाठी अनेक गोष्टी कराव्या लागतील म्हणून काँग्रेसने निवडणूका लढविल्या पाहिजेत. विधिमंडळात गेले पाहिजे. चित्तरंजन दास यांनी गया येथील काँग्रेसमध्ये जो विचार मांडला त्याला पं. मोतीलाल नेहरू, लाला लजपतराय, बिपिनचंद्र पाल इ. नेत्यांनी समर्थन दिले. या विचाराला गांधीवादी विचारसरणीच्या लोकांनी विरोध केला. त्यांच्या मते गांधीजींनी जाहीर केलेल्या कार्यक्रमात कसलाही बदल करू नये. त्यामुळे चित्तरंजनदास यांनी अखिल भारतीय काँग्रेस समितीच्या अध्यक्ष पदाचा राजीनामा दिला. त्यांच्याबरोबर लाला लजपतराय, बिपिनचंद्र पाल, पं. मोतीलाल नेहरू यांनीही राजीनामा दिला आणि स्वराज्य पक्षाची स्थापना केली. स्वराज्य पक्षाचे अध्यक्षपद देशबंधू चित्तरंजन दास यांना देण्यात आले. तर पं. मोतीलाल नेहरू यांना सेक्रेटरी करण्यात आले.

**स्वराज्य पक्षाच्या उदयाची कारणे :**

**१) म. गांधीजीवर नाराज आंदोलक** – म. गांधीजींनी असहकार आंदोलन सुरू केले होते. या आंदोलनात हजारो लोकांनी भाग घेतला व त्यांच्या आदेशाप्रमाणे अनेक लोक तुरुंगात गेले. अहिंसक मार्गाने सुरू झालेले हे पहिलेच देशातील व्यापक आंदोलन होते. परंतु चौरी-चौरा या ठिकाणी लोकांनी हिंसक कृत्य केल्यामुळे गांधीजींनी ही चळवळ अचानकपणे थांबविल्याचे जाहीर केले. त्यामुळे अनेक नेते नाराज झाले. गांधीजींच्या विचाराशी ते सहमत नव्हते. त्यांनी गांधीजीवर कडक टिका केली आणि नवीन पक्ष स्थापण्याची मागणी केली. त्यामुळे स्वराज्य पक्षाचा उदय झाला.

**स्वराज्य पक्षाच्या उदयाची कारणे**
- म. गांधीजीवर नाराज आंदोलक
- नव्या कार्यक्रमाची आवश्यकता
- नॅशनल लिबरल पक्षाचे अपयश
- असहकाराचा नवीन मार्ग
- राजकीय संघर्ष आवश्यक
- फेरवादी-नाफेरवादी संघर्ष

**२) नव्या कार्यक्रमाची आवश्यकता** – म. गांधीजींनी असहकार आंदोलनाची चळवळ मागे घेतली. वास्तविक पाहता खिलाफत चळवळ आणि असहकार आंदोलन या दोन्हीही गोष्टी एकमेकींना जोडून म. गांधीजींनी हिंदू मुसलमानांना एकत्र आणण्याचा प्रयत्न केला. परंतु गांधीजींनी आंदोलन मागे घेतल्याने पुढे काय करावयाचे या बाबत जनतेला कोणतीच दिशा मिळत नव्हती. नेमके म. गांधीजी यावेळी तुरुंगात होते. गांधीजींच्या सांगण्यावरून अनेक विद्यार्थ्यांनी शाळा व नोकऱ्या सोडल्या होत्या. अनेकांनी वकिलीचा व्यवसाय सोडला होता. तेव्हा या सर्वांच्यापुढे आता पुढे काय

## सविनय कायदेभंगाची चळवळ (१९३०-३१)

१४ फेब्रुवारी ते १६ फेब्रुवारी या तीन दिवसात साबरमती आश्रमात काँग्रेसच्या कार्यकारिणीची बैठक झाली. या बैठकीत काँग्रेस कार्यकारिणीने सविनय कायदेभंग चळवळ सुरू करण्यासंबंधीचे सर्व अधिकार म. गांधीजींना दिले. यावेळी म. गांधीजींनी व्हॉइसरॉय याला पत्र लिहून त्याच्यापुढे खालील अकरा मागण्या मांडल्या.

१) पूर्णपणे देशात दारूबंदी करावी.
२) भारतीय रूपयाचे अधिमूल्यन करण्यात यावे.
३) महसुल कर निम्मे करण्यात यावा आणि तो विषय राज्यान्तर्गत करण्यात यावा.
४) मीठावरील कर पूर्णतः माफ करावा.
५) लष्करावरील खर्च कमी करण्यात यावा. सध्या लष्करावर करण्यात येणाऱ्या खर्चापेक्षा तो निम्मे करण्यात यावा.
६) परदेशातून आयात होणाऱ्या कापडावर आयात शुल्क लागू करण्यात यावे.
७) सागरी व्यापार संरक्षण कायदा मंजूर करण्यात यावा.
८) सर्व राजकीय कैद्यांची मुक्तता करावी.
९) भारतातून निर्वासित झालेल्या सर्व लोकांना भारतात परत येण्यास परवानगी द्यावी.
१०) लोकांना आत्मसंरक्षणार्थ शस्त्रास्त्रे धारण करण्याचे परवाने देण्यात यावे.
११) गुप्तचर यंत्रणा बरखास्त करावी किंवा तिला जन नियंत्रणात ठेवावे.

म. गांधीजींनी वरील अकरा मागण्यांचे निवेदन ब्रिटिश सरकारला पाठवून जर या मागण्या सरकारने मान्य केल्या नाहीत तर भारतात सविनय कायदेभंगाची चळवळ सुरु करण्यात येईल असे कळविले. ही चळवळ मीठाचा सत्याग्रह किंवा दाण्डी यात्रा या नावानेही ओळखली जाते.

## सविनय कायदेभंग चळवळीची कारणे :

### १) आर्थिक महामंदीचा परिणाम :-

यावेळी जगात आर्थिक महामंदी चालू होती. तिचा परिणाम भारतावरही होणे अपरिहार्य होते. या आर्थिक महामंदीविरूद्ध कोणतीही उपाययोजना न केल्याने भारतातील व्यापारी, कारखानदार, मजूर, शेतकरी आणि मध्यम वर्ग हा त्रस्त झाला होता. तेव्हा एखादे आंदोलन केल्याशिवाय सरकार जागे होणार नाही असे म. गांधीजींना वाटल्याने त्यांनी सविनय कायदेभंगाची चळवळ करण्याचे ठरविले.

त्यांनी तरुणांच्या हातात सत्ता द्यावी व भारतामध्ये तरुणांना लष्करविषयक शिक्षण देऊन भारताचे संरक्षण करण्याची जबाबदारी त्यांच्यावर सोपवावी.

वरील सर्व कारणामुळे काँग्रेसने ३० डिसेंबर १९४१ रोजी बारडोली येथे भरलेल्या कार्यकारिणीच्या बैठकीत वैयक्तिक सत्याग्रह स्थगित करण्याचे ठरविले. यावेळी असे ठरले, की तात्पुरते गांधीजींनी या कार्यापासून दूर रहावे आणि तरुण नेत्यांनी देश युध्दासाठी तयार करावा.

## क्रिप्स योजना – (१९४२)

दुसरे महायुद्ध सुरु झाल्यानंतर १९४० मध्ये इंग्लंडमध्ये राजकीय स्थित्यंतर घडून आले. मजूर पक्षाचा पराभव झाला आणि त्याऐवजी हुजूर पक्ष निवडून आला. विन्स्टन चर्चिल हे इंग्लंडचे नवे पंतप्रधान बनले. ते साम्राज्यवादी प्रवृत्तीचे होते. परंतु १९४२ मध्ये दुसरे महायुद्ध चालू असताना अशा काही घटना घडल्या की त्यामुळे विन्स्टन चर्चिल यांना हिंदुस्थानच्या मागण्यांकडे लक्ष पुरविणे गरजेचे झाले. याच काळात चीनचे सेनापती चँग-कै-शेक हे हिंदुस्थानच्या दौऱ्यावर येऊन गेले. त्यांनी येथील परिस्थितीची पाहणी केली. तेव्हा त्यांनाही जाणवले की, हिंदी लोकांच्या काही न्याय्य मागण्या पूर्ण केल्या पाहिजेत. जाहीरपणे त्यांनी या मागण्यांचा पुरस्कार केल्याने ११ मार्च १९४२ रोजी इंग्लंडच्या पार्लमेंटमध्ये विन्स्टन चर्चिल यांनी हिंदुस्थानमध्ये तेथील लोकांच्या मागण्यांचा विचार करण्यासाठी एक शिष्टमंडळ लवकरच पाठविले जाईल असे जाहीर केले. त्याप्रमाणे क्रिप्स शिष्टमंडळ २२ मार्च १९४२ रोजी हिंदुस्थानच्या दौऱ्यावर आले.

## क्रिप्स मिशन हिंदुस्थानात पाठविण्याची कारणे :

सर स्टॅफर्ड क्रिप्स इंग्लंडमधील प्रसिद्ध नेते होते. काही दिवसापूर्वी रशियात जाऊन त्यांनी तेथे राजकीय यश मिळविले होते. ते हिंदुस्थानचे हितचिंतक मित्र म्हणून ओळखले जात होते. यापूर्वी ते हिंदुस्थानात दोन वेळा येऊन गेल्याने हिंदुस्थानातील बरेचसे नेते त्यांचे ओळखीचे होते. पंडीत जवाहरलाल नेहरूंशी त्यांची विशेष मैत्री होती. अशी व्यक्ती भारतामध्ये येणार ही घटना महत्त्वाची मानली जात होती. क्रिप्स यांना हिदुस्थानात पाठविण्याची पुढील कारणे होती.

**१) ब्रिटिशांविरुद्धचा असंतोष थांबविणे :–** दुसऱ्या महायुध्दात ब्रिटिशांनी काँग्रेसला न विचारता भाग घेतला व या युद्धात भारतीयांना ढकलले. या विरुद्ध भारतीयांनी आवाज उठविणे आवश्यक होते. याचा एक भाग म्हणून काँग्रेसने वैयक्तिक सत्याग्रह करण्याचे ठरविले. हा सत्याग्रह थांबविणे आवश्यक होते.

**'चले जाव' आंदोलन (१९४२) –** सर स्टॅफर्ड क्रिप्स हे मजूर पक्षाचे सभासद होते. हा पक्ष भारताच्या स्वातंत्र्याच्या मागणीकडे सहानुभूतीपणे पाहणारा पक्ष होता. म्हणून सर स्टॅफर्ड क्रिप्स यांच्याकडून भारतीयांना फार मोठी अपेक्षा होती. ते कोणती तरी चांगली योजना देतील की ज्यामुळे भारतीयांचे समाधान होईल असे जनतेला वाटत होते. पण सर स्टॅफर्ड क्रिप्स यांच्या योजनेने भारतीयांचे समाधान न झाल्यामुळे भारतातील बहुतेक सर्वच पक्षांनी ही योजना फेटाळून लावली. तेव्हा आता स्वातंत्र्यासाठी पुन्हा आंदोलन करण्याशिवाय दुसरा कोणताच पर्याय भारतीयांसमोर उरला नाही. त्यामुळे काँग्रेस पक्षाला 'चले जाव' किंवा 'भारत छोडो' आंदोलन करावे लागले. त्याला पुढील कारणे कारणीभूत झाली.

## चले जाव आंदोलन सुरू करण्याची कारणे :

**१) क्रिप्स मिशनची असफलता –** क्रिप्स मिशनच्या असफलतेमुळे भारतीयांसमोर आंदोलन करण्याशिवाय दुसरा कोणताच पर्याय उरला नाही.

**२) स्वातंत्र्यासाठी आंदोलन –** काँग्रेसला आता स्वातंत्र्याशिवाय दुसरी कोणतीच योजना नको होती आणि ब्रिटिश सरकार तेच द्यावयास तयार नव्हते. तेव्हा आंदोलन करून स्वातंत्र्य मिळविले पाहिजे. त्यासाठी चळवळ हाच एकमेव मार्ग आहे असे जनतेला वाटू लागले.

**चले जाव आंदोलनाची कारणे**
- **क्रिप्स मिशनची असफलता**
- **स्वातंत्र्यासाठी आंदोलन**
- **जपानची वाढती भीती**
- **महागाईने जनता त्रस्त**

**३) जपानची वाढती भीती –** दुसऱ्या महायुद्धात जपानने इंग्रजांना पराजित करून सिंगापूर, मलेशिया आणि ब्रह्मदेश जिंकून घेतला होता. यावरून म. गांधीजींच्या लक्षात आले की, ब्रिटिश हे भारताचे संरक्षण करण्यास असमर्थ आहेत. जर ब्रिटिशांचे राज्य येथे असेच राहिले तर जपान भारतावर हल्ला केल्याशिवाय राहणार नाही. तेव्हा आपणच जर ब्रिटिशांना येथून निघून जा म्हणून सांगितले आणि खरोखरीच जर ब्रिटिश येथून निघून गेले तर जपान हा भारतावर हल्ला करणार नाही असे म. गांधीजींना वाटत होते. म्हणून त्यांनी 'चले जाव' आंदोलन सुरू केले.

**४) महागाईने त्रस्त जनता –** १९३९ मध्ये दुसरे महायुद्ध सुरू झाले. सरकारला युद्धासाठी प्रचंड प्रमाणात पैसा हवा होता. कारण युद्धाचा खर्च वाढत होता. तेव्हा सरकारने येथील जनतेवर नवे कर लादले. युद्ध काळात अनेक वस्तूंची टंचाई निर्माण झाली. अन्न-धान्य, साखर, तेलबिया यांचा प्रचंड प्रमाणात तुटवडा निर्माण झाला. या वस्तुंच्या किंमती वाढल्या. ज्या वस्तू जीवनाश्यक होत्या त्या बाजारात मिळेनाशा

विसरुन चालणार नाही.

**(११) चले जाव आंदोलनाबाबत काही नेत्यांची मते –**

पंडीत जवाहरलाल नेहरु म्हणतात, चले जाव आंदोलनात जे काही घडले त्याबद्दल मी आनंदी आहे.

सरदार वल्लभभाई पटेल या आंदोलनाबाबत म्हणाले, यापूर्वी भारतात ब्रिटीश राज्यावर एवढे मोठे संकट कधीच आले नव्हते.

भारताचे पहिले राष्ट्रपती डॉ. राजेंद्रप्रसाद यांच्या मते, या आंदोलनामुळे जनतेतील धैर्य आणि ब्रिटीशांशी दोन हात करण्याची हिंमत वाढली हे चले जाव आंदोलनाचे फलित होय.

१९४६ मध्ये ब्रिटीश सरकारने भारतीय पेचप्रसंग सोडविण्यासाठी पाठविलेल्या कॅबिनेट मिशनबरोबर आलेल्या वुड्रो वॅट यांनी म्हटले होते की, १९४२ नंतर भारतीय जनतेत खोलवर व व्यापक अशी ब्रिटीश विरोधी भावना पसरलेली दिसत आहे. हा चले जाव आंदोलनाचाच परिणाम आहे.

## सुभाषचंद्र बोस व आझाद हिंद सेना

हिंदुस्थानच्या इतिहासात नेताजी सुभाषचंद्र बोस व आझाद हिंद सेना यांचे कार्य सुवर्णाक्षरांनी लिहिण्यायोग्य आहे. म. गांधीजींनी अहिंसा व सत्याग्रहाच्या द्वारे हिंदुस्थानला स्वातंत्र्य मिळवून दिले. परंतु ब्रिटीशांना हे स्वातंत्र्य देण्यास अप्रत्यक्षपणे आझाद हिंद सेनेने भाग पाडले असे म्हटले जाते. कारण ज्या फौजेच्या सहाय्याने ब्रिटीशांनी हिंदुस्थानात सुमारे दीडशे वर्षे राज्य केले, तीच फौज आता ब्रिटीश राजनिष्ठेपासून ढळली. तेव्हा राज्य कोणाच्या जोरावर करावयाचे हा प्रश्न इंग्लंडचा पंतप्रधान ॲटली याच्या समोर निर्माण झाला. त्यामुळे हिंदुस्थानाला स्वातंत्र्य द्यावे लागले.



सुभाषचंद्र बोस

**पूर्व जीवन –** सुभाषचंद्र बोस यांचा जन्म २३ जानेवारी १८९७ रोजी कटक येथे झाला. त्यांच्या वडिलांचे नाव जानकीनाथ तर आईचे नाव प्रभादेवी होते. त्यांचे वडील वकील होते. बालपणापासून सुभाषचंद्र बोस क्रांतीकारी विचारसरणीचे होते. प्रारंभीच्या काळात अध्यात्माने प्रेरीत होऊन त्यांनी हिमालयात भटकंती केली. एका इंग्रज शिक्षकाने भारतीयांचा अपमान करणारे शब्द उच्चारल्याने सुभाषचंद्र बोसांनी त्या शिक्षकाला चांगलेच फटकारले. त्यामुळे त्या महाविद्यालयातून सुभाषचंद्र बोस

केली व घटना समितीच्या निवडणुकीनंतर हंगामी सरकारने बाबत वाटाघाटी कराव्यात असे व्हाईसरॉयने जाहीर केले.

**घटना समितीच्या निवडणुका–** जुलै १९४६ मध्ये घटना समितीच्या निवडणुका झाल्या. ब्रिटीश हिंदुस्थानमधील सर्वसाधारण मतदार संघातील २१० जागांपैकी काँग्रेसने १९९ जागा जिंकल्या. ७८ मुस्लिम जागापैकी ७३ जागा मुस्लिम लीगने जिंकल्या होत्या. घटना समितीमध्ये काँग्रेस पक्षाला जबर बहुमत मिळाले होते. त्यामुळे मुस्लिम लीग चिडली होती.

घटना समितीची पहिली बैठक ९ डिसेंबर १९४६ रोजी भरली. पण तिच्या कामकाजात मुस्लिम लीगने भाग घेतला नाही. ११ डिसेंबर १९४६ रोजी घटना समितीचे अध्यक्ष म्हणून डॉ. राजेंद्रप्रसाद यांची निवड झाली.

## हिंदुस्थानच्या स्वातंत्र्याचा कायदा (१९४७)

माऊंटबॅटन योजनेप्रमाणे हिंदुस्थानच्या स्वातंत्र्याचे विधेयक ब्रिटिश पार्लमेंटपुढे मांडण्यात आले व १६ जुलै १९४७ रोजी दोन्ही सभागृहांनी त्याला मान्यता दिली. त्यानंतर १८ जुलै १९४७ रोजी इंग्लंडच्या बादशहाने त्याला संमती देताच त्याचे कायद्यात रुपांतर झाले. हा कायदा 'हिंदुस्थानच्या स्वातंत्र्याचा कायदा १९४७' या नावाने ओळखला जातो. या कायद्यातील कलमे पुढीलप्रमाणे होत.

१) १५ ऑगस्ट १९४७ रोजी भारत आणि पाकिस्तान ही दोन स्वतंत्र राष्ट्रे निर्माण होतील व ब्रिटिश पार्लमेंट सर्व सत्ता त्यांच्याकडे सोपवील.

२) जोपर्यंत दोन्ही देशात नवीन राज्यघटना तयार होत नाही तोपर्यंत दोन्ही राष्ट्रांच्या सभागृहांना कायदे बनविण्याचा अधिकार राहील.

३) प्रत्येक राष्ट्राला आपल्या इच्छेनुसार राज्यघटना तयार करण्याचा अधिकार राहील. त्यांनी राष्ट्रकुलात रहावयाचे किंवा नाही याचा निर्णय त्यांनी घ्यावयाचा आहे.

४) १५ ऑगस्ट नंतर ब्रिटिश सरकारचे कोणत्याच प्रांतावर वा भागावर नियंत्रण राहणार नाही.

५) जोपर्यंत नवीन राज्यघटना अस्तित्वात येत नाही तोपर्यंत १९३५ च्या कायद्याने राज्यकारभार चालेल. पण त्यात बदल करण्याचा अधिकार दोन्ही राष्ट्रांना मिळेल.

६) या कायद्याद्वारे भारत मंत्र्यांचे पद रद्द करण्यात येत आहे व त्यांचे अधिकार राष्ट्रकुलातील सचिवाला देण्यात येत आहेत.

७) ब्रिटिश सम्राटाला "हिंदुस्थानचा सम्राट" म्हणून दिलेले पद रद्द करण्यात येत